या राशीची व्यक्ती छोट्या छोट्या गोष्टींवर नाराज आणि भावनिक होते

ज्योतिषशास्त्रात १२ राशींचा उल्लेख आहे. ज्योतिषानुसार प्रत्येक राशीचा स्वभाव वेगळा असतो. काही राशींना पटकन राग येत नाही तर काही राशी लहान गोष्टींवर रागावतात. अशा परिस्थितीत लोकांना काही सांगण्यापूर्वी बऱ्याच वेळा विचार करावा लागतो. असे लोक किंचित भावनिक आणि असुरक्षित असल्याचे मानले जाते. अशा त्या कोणत्या राशी आहेत याची माहिती पुढे दिली आहे.

कर्क राशीचे लोक भावनिक आणि मूडी असतात. छोट्या छोट्या गोष्टींचा त्यांचा राग येतो. काहीही बोलण्यापूर्वी त्यांना बऱ्याच वेळा विचार करावा लागतो. आपल्या छोट्या छोट्या गोष्टींमुळे हे लोक मैत्री किंवा नातेसंबंध मोडण्यास मागेपुढे पाहत नाहीत.

कन्या राशीचे लोक किंचित भावनिक आणि कमी बोलणारे असतात. त्यांच्या मनात आधीपासूनच त्यांच्या मर्यादा आणि दोष आहेत. बऱ्याच वेळा हास्य आणि विनोदी गोष्टींवर देखील या लोकांना राग येतो. म्हणून, यांच्याशी काही ही बोलताना विचारपूर्वक बोलायला पाहिजे.

वृश्चिक राशीच्या लोकांच्या मनात काय चालले आहे हे समजणे कठीण आहे. त्याच्या मनात एकाच वेळी बर्याच गोष्टी चालू असतात. त्यांना कोणत्याही मजेदार परिस्थितीत स्वत: ला सामील करू इच्छित नाही आणि कोणी असे केले तर त्यांना राग येतो.

मीन राशीचे लोक भावनिक असतात. त्यांना नेहमी विचारपूर्वक सांगितले पाहिजे जेणेकरून त्यांना कोणत्याही प्रकारे दुखापत होणार नाही. जर बाहेरील व्यक्तीने त्यांना काही विनोद किंवा परिस्थितीत आणले तर ते चिडतात व नाराज होऊन जातात.

स्वयंपाकघर कुठे असावे?

स्वयंपाकघर पूर्वेस (त्यातही शक्यतो आग्नेयेस) असावे. सर्वसाधारण स्वयंपाकाची वेळ व सूर्योदयाची वेळ एकच असते. तेव्हा उजेड व निरोगी सूर्यप्रकाशात काम करण्याचे फायदे व्हावेत हा संकेत असावा.

रविचे कुंडलीतील स्थानाचे महत्त्व

रवि पंचमात असेल तर प्रथम संतती पुत्रसंतती असण्याची शक्यता असते. निदान अशा व्यक्तींना निश्चितपणे पुत्रसंतती होते.

कुंभ लग्न असून सप्तमेश रवि जर का सप्तमेश रवि जर का सप्तमातच असेल तर अशा मनुष्याला एक किंवा दोन यापेक्षा जास्त संतती होत नाही.

सुख शांती समाधान

खालील झाडाची पूजा केल्याचे महत्त्व जाणून घ्या

ज्योतिष शास्त्रानुसार काही विशेष झाडांची पूजा केल्याने आमच्या पत्रिकेतील दोष दूर होतात तसेच जीवनातील बऱ्याच अडचणी देखील दूर होण्यास मदत मिळतात. कोणत्या झाडांची पूजा केल्याने काय फायदा मिळतो ते पाहूया...

☞ **तुळस-** ज्या घरात रोज तुळशीची पूजा होते, लक्ष्मी ते घर कधीच सोडून जात नाही. त्या घरात नेहमी सुख समृद्धी बनलेली असते. पिंपळ हिंदू धर्मात पिंपळाला पवित्र वृक्ष मानण्यात आले आहे. याची पूजा केल्याने शनी दोषापासून मुक्ती मिळते, तसेच विष्णूची कृपा सदैव तुमच्यावर राहते.

☞ **वड-** याला वडाचे झाड किंवा बरगद देखील म्हणतात. याची पूजा केल्याने स्त्रियांचे सौभाग्य अखंड राहतं आणि संतानं संबंधी समस्या दूर होण्यास मदत मिळते. हे फारच पवित्र झाड आहे.

☞ **बेल-** या झाडाचे पान आणि फळ महादेवाला अर्पित केले जाते. याची पूजा केल्याने नोकरीत बढतीचे योग लवकर येतात तसेच अकाली मृत्यूपासून रक्षा होते.

☞ **आवळा-** या झाडाची पूजा केल्याने लक्ष्मी प्रसन्न राहते आणि पूजा करणाऱ्यांना धन संबंधी अडचण कधीच येत आहे. त्याला प्रत्येक क्षेत्रात यश मिळत.

☞ **अशोक-** या झाडाची पूजा केल्याने सर्व प्रकारचे रोग दूर होतात आणि कौटुंबिक जीवन आनंदी राहत. एखाद्या विशेष इच्छेसाठी देखील याची पूजा केली जाते.

☞ **लाल चंदन-** सूर्याशी निगडित गृह दोष दूर करण्यासाठी लाल चंदनच्या झाडाची पूजा विधिवत केली पाहिजे. असे केल्याने प्रमोशन होण्याचे योग बनतात.

☞ **शमी-** या झाडाची पूजा केल्याने शत्रूवर विजय मिळते व कोर्ट केसमध्ये यश मिळतात. दसऱ्याच्या दिवशी या झाडाची खास पूजा केली जाते.

☞ **केळी-** ज्या लोकांच्या पत्रिकेत गुरु संबंधित दोष असतील तर, त्यांनी या झाडाची पूजा केली तर त्यांना नक्कीच फायदा मिळतो. याची पूजा केल्याने विवाहाचे योग लवकर जुळून येतात.

☞ **कडूलिंब-** याची पूजा केल्याने पत्रिकेतील सर्व दोष दूर होतात व आजारांपासून मुक्ती मिळते. घरात सुख शांती कायम राहते.

पूर्वजांचे फोटो कोठे लावावेत?

पूर्वजांचे फोटो कुठे लावावे? हा प्रश्न नेहमी आपल्याला पडलेला असतो. तर पूर्वज, मेलेल्या व्यक्ती यांचे फोटो जर त्यांना तुम्ही आदर्श मानत आहात तर ते उत्तर किंवा पश्चिम दिशेच्या भिंतीवर लावावे.

वर्षातून एकदा घरात उदकशांती करा

वर्षातून एकदा तरी घरात उदकशांती करावी. वास्तुदोष निवारणासाठी वर्षातून एकदा तरी दगि भात, नारळ यांचे उतारे घरावरून करावे. तसेच घरच्या घरी ग्रहयज्ञ करावा.

झोप येण्यासाठी हा मंत्र जपा



वास्तुशांती केव्हा केव्हा करावी

जेव्हा घराचा दरवाजा बदलला जातो तेव्हा घर नव्याने जन्म घेते. म्हणून वास्तुशांती करणे आवश्यक असते. नवीन घरात जाताना, घरात घुबड शिरल्यास, घरात कबुतराने घरटे केल्यास, मधमाश्यांचे पोळे घराला लागल्यास, अपमृत्यू झाल्यास, घराचा दरवाजा बदलल्यास वास्तुशांती करावी असे ग्रंथात सांगितले आहे.

वास्तू दोष दूर होतात

शास्त्रानुसार, हवन पूजा केल्याने वातावरणात सकारात्मक उर्जेचा संचार होतो. घर बांधताना वास्तू दोष दूर करण्यासाठी हवन केले जाते. घर बांधण्यात कोणत्याही प्रकारचे वास्तू दोष असू नये म्हणूनच बांधकामापूर्वी शुभ मुहूर्तावर भूमिपूजन आणि शिलान्यासची पूजा केली जाते. यानंतर घरात प्रवेश करण्यापूर्वी घराच्या प्रवेशद्वाराची पूजा केली जाते. जेणेकरुन आतील आणि बाहेरील वातावरण शुद्ध आणि पवित्र बनेल.

तर बारामतीत निर्बंध आणखी शिथिल करणार - अजित पवार

■ बारामती

बारामतीमधील विद्या प्रतिष्ठानच्या सभागृहात कोरोना परिस्थिती आणि त्यावरील उपाययोजनांचा आढावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज शनिवारी घेतला. त्यावेळी अजित पवार म्हणाले की, बारामती शहरासह ग्रामीण भागात कोरोना रुग्णांची संख्या कमी होत आहे पॉझिटिव्हीटी दर पाच टक्क्यांच्या आत राहिल्यानंतरच निर्बंध आणखी शिथिल केले जातील, प्रशासनाने पुढील दोन दिवसांनी परिस्थिती पाहून निर्णय घ्यावा, असे निर्देश अजित पवार यांनी दिले.

कोरोना प्रतिबंधक लस जास्तीत जास्त उपलब्ध करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. लसीकरणाचे योग्य नियोजन करण्यात यावे. म्युकरमायकोसिसची लक्षणे, काळजी, उपचार यांची माहिती ग्रामीण भागात सर्वदूर पोहोचवावी,असे उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, यावेळी बारामतीच्या नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे, पंचायत समितीच्या सभापती निता फरांदे, उपनगराध्यक्ष अभिजीत जाधव, पंचायत समिती उपसभापती रोहित कोकरे, उपविभागीय अधिकारी दादासाहेब कांबळे, महावितरणचे मुख्य कार्यकारी अभियंता सुनिल पावडे आदी उपस्थित होते. दरम्यान, हिराभाई बुटला विचारमंच यांच्याकडून फिरता दवाखानाचे (मोबाईल क्लिनिक व्हॅन) उद्घाटन उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अमेरीकेचे डॉ. दीपेश राव यांच्याकडून म्युकरमायकोसिससाठी लागणाऱ्या इंजेक्शनचे २५ डोस रुई ग्रामीण रुग्णालयास उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आले.

कोरोनाने पालक गमावलेल्या बालकांना तातडीने मदत द्या

जालना- कोरोना महामारीच्या काळात जिल्ह्यात ज्या बालकांचे पालक कोरोनाने दगावले आहेत अशा बालकांचे सर्व्हेक्षण करा. तसेच या बालकांना शासन निर्देशानुसार तातडीने मदत करा, असे आदेश जिल्हाधिकारी रवींद्र बिनवडे यांनी दिले आहेत.

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर बालकांच्या काळजी व संरक्षणासाठी नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय कृती दलाची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी रवींद्र बिनवडे यांनी हे आदेश दिले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक विनायक देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रताप सवडे उपस्थित होते. कोरोना महामारीच्या काळात जिल्ह्यात ज्या बालकांचे पालक कोरोनामुळे दगावले आहेत अशा बालकांना बाल संगोपन योजनेंतर्गत मदत मिळावी म्हणून कृतीदलाची स्थापना करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यातील अशा बालकांना तातडीने मदत उपलब्ध करून द्या. कोरोनामुळे पालक गमावलेले जे बालक आपल्या नातेवाईकांकडे राहत असतील अशा बालकांचा सांभाळ योग्यरितीने होतो किंवा नाही याबाबत खात्री करून घ्या. त्यासाठी पथक तयार करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी बिनवडे यांनी दिले.

इंधन दरवाढीविरोधात काँग्रेसचे गोरेगावात आंदोलन

■ मुंबई

पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या किंमतीमध्ये भरमसाठ झाली असून यावरून आपला रोष व्यक्त करण्यासाठी आज शनिवारी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी गोरेगाव पश्चिम येथील पेट्रोल पंपासमोर धरणे आंदोलन करत केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणा दिल्या. या आंदोलनात मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष भाई जगताप यांची हजेरी लावली होती.

यावेळी जगताप म्हणाले की, काल काँग्रेस पक्षाने देशभर पेट्रोल, डिझेल दरवाढीविरोधात आंदोलन केले होते. हे आंदोलन गरीब लोकांचे आहे. आज मुंबईत पाऊस होता. आज आम्ही ठरवले होते की, पाऊस येऊ दे की जोरदार वारा येऊ दे, आम्ही मुंबईत आंदोलन करणारच. या आंदोलनात महिला मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. महिलांना या दरवाढीचा सर्वात मोठा फटका सहन करावा लागत आहे. काँग्रेस सत्तेत असताना भाजपच्या हेमा मालिनी आणि स्मृती इराणी पेट्रोल, डिझेल दराबाबत सतत वक्तव्य करत होत्या. त्यावेळी पेट्रोल, डिझेलचा भाव हा आताच्या भावापेक्षा अर्ध्यावर होते. आता हेमा मालिनी आणि स्मृती इराणी कुठे गेल्या. भाजप सरकारने पेट्रोल, डिझेलवर ३१ आणि ३२ रुपये अधिभार लावला आहे. देशाच्या इतिहासात आता इतका अधिभार कोणत्याच सरकारने लावला नाही. तो अधिभार भाजप सरकारने कमी करावा, असे भाई जगताप यांनी म्हटले.

पश्चिम रेल्वे

०४ लिफ्ट्सची तरतूद

निविदा सूचना क्र. : **EL166/1/WA/7 dt. 08/06/2021.** कार्य आणि स्थळ : मुंबई सेंट्रल - नवीन तळ + ५ मजल्याची इमारत येथे ०४ लिफ्ट्सची तरतूद करणे. कामाचे अंदाजित मूल्य : ₹ ७२,०२,९५६/- इरअ: निरंक. सादर करण्याची तारीख व वेळ: **०९.०७.२०२१** रोजी **१५.०० वा.** पर्यंत. उघडण्याची तारीख व वेळ : **०९.०७.२०२१** रोजी **१५.३०** वाजता. टीप : निविदा दस्तावेज, शुध्दिपत्र आणि अधिक तपशील डाऊनलोड करण्यासाठी कृपया आमच्या संकेतस्थळ **www.ireps.gov.in** वर भेट द्या. ०१७२

आम्हाला लाइक करा facebook.com/WesternRly

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली (१) **शेवंताबाई बारकू झुगरे,** (२) **सरुबाई रामा झुगरे,** (३) **देवराम रावजी धापटे** यांचे मालकीहक्काची व हिस्से कब्जेवहिवाट असलेली **मौजे माळ, ता.शहापूर, जि.ठाणे** येथील जमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदीखताद्वारे विकत घेणेचे निश्चित केले आहे.

जमिनीचे परिशिष्ट

मौजे माळ, ता.शहापूर, जि.ठाणे

गावाचे नाव	शेतकऱ्याचे नाव	गट क्रमांक	क्षेत्रफळ (हे.आर.प्र.)	आकार (रु.पै.)
मौजे माळ ता.शहापूर, जि.ठाणे	(१) शेवंताबाई बारकू झुगरे, (२) सरुबाई रामा झुगरे, (३) देवराम रावजी धापटे	८७/२	९-१८-०० पैकी विकत दिलेले क्षेत्र ४-६०-००	४-५८

तरीही ज्यांना सदर मिळकतीसंदर्भात इतर हक्क अधिकार अथवा बोजा, क्लेम, वारसाहक्क, बक्षिस, साठेकरार, पोटगीहक्क, अथवा, इतर कोणतेही हक्क कुलमुखत्यारहक्क, भाडेपट्टा हक्क, गहाण हक्क, कोर्ट कारवाई इ. प्रकारचे हक्क असल्यास त्यांनी योग्य त्या कागदपत्रासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत त्यांचा हक्क खालील नमूद पत्त्यावर प्रत्यक्ष भेटून आणि आवश्यक कागदपत्रे दाखवून लेखी स्वरुपात कळवावे. विहीत मुदतीत जर कोणत्याही हरकती प्राप्त न झाल्यास माझे अशिल सदर मिळकतीसंदर्भात व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

सही/-

पत्ताः- मु.पो.आटगांव, ता.शहापूर, जि.ठाणे.

अॅड.सिद्धार्थ अरुण चंद्रमोरे

९२२१८०२६१७/ ९१७२८८६६१८

सरकारी कर्मचाऱ्यांचा भत्ता कमी करण्याचा मोदी सरकारचा निर्णय

नवी दिल्ली - कोरोना महासंकटात केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांना मोठा झटका बसला असून मोदी सरकारने त्यांच्या ओव्हरटाइम भत्ता आणि बक्षीसांसारख्या खर्चामध्ये कपात करण्याचे ठरवले आहे. कोरोना संकटात आलेल्या आर्थिक अडचणीमुळे केंद्रीय वित्त मंत्रालयाने जाहिराती, प्रसिद्धी, जादा कामाचा भत्ता, बक्षिसे, घरगुती आणि परदेशी प्रवास खर्च, किरकोळ देखभाल कामांवर सर्व केंद्रीय सरकारी मंत्रालये आणि विभागांना २० टक्के खर्च कपात करण्याचे आदेश दिले आहे. केंद्रीय वित्त मंत्रालयाने सर्व सचिवांना आणि मंत्रालय आणि विभागांचे आर्थिक सल्लागार यांना जारी केलेल्या सूचनांची यादीत जादा कामाचा भत्ता, बक्षिसे, घरगुती प्रवास, परदेशी प्रवास खर्च, कार्यालयीन खर्च, भाडे, दर आणि कर, रॉयल्टी, प्रकाशने, इतर प्रशासकीय खर्च आणि साहित्य, रेशनची किंमत, जाहिरात व जाहिराती, छोटे काम, देखभाल , सेवा शुल्क, योगदान आणि इतर शुल्क यांचा समावेश करण्यात आला आहे.

कडोंमपा क्षेत्रातील नागरी सुविधा केंद्रे साप्ताहिक सुट्टी दिवशीही सुरु राहणार

■ कल्याण

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील करदात्या नागरिकांना कर भरणे सुलभ व सोयीचे व्हावे म्हणून ३१ जुलै २०२१ पर्यंत कार्यालयीन दिवशी तसेच साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी महापालिकेची नागरी सुविधा केंद्रे खाली नमुद केलेल्या वेळेप्रमाणे सुरु राहणार आहेत.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील शिवाजी चौक, कल्याण पश्चिम हे नागरी सुविधा केंद्र कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी स. ८.०० ते रा. ८.०० वाजेपर्यंत तसेच शनिवार व रविवार या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत सुरु राहणार आहे. डोंबिवली विभागीय कार्यालय, बाजी प्रभू चौक, डोंबिवली पूर्व येथील नागरी सुविधा केंद्र कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी स. ८.०० ते रा. ८.०० वाजेपर्यंत तसेच शनिवार व रविवार या दिवशी स. १०.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत सुरु राहणार आहेत. ब प्रभागक्षेत्र कार्यालय, बारावे रोड, कल्याण पश्चिम येथील नागरी सुविधा केंद्र कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत, तसेच शनिवार व रविवार या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत सुरु राहणार आहे. तरी नागरिकांनी आपल्या कराचा भरणा वेळेवर करुन महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात आले आहे.

भरधाव कंटेनरच्या धडकेत पिता-पुत्राचा दुर्दैवी मृत्यू

जळगाव- चाकीस भरधाव कंटेनरने दिलेल्या जोरदार धडकेत दुचाकीस्वार पिता-पुत्राचा मृत्यू झाला. हा भीषण अपघात काल रात्री गुजराल पेट्रोल पंपाजवळ झाला. नागेश्वर पवार (३५) व त्यांचा मुलगा कार्तिक (५) अशी मृतांची नावे आहेत. पवार हे पिंप्राळ्यात पत्नी व दोन मुलांसह राहत होते. ते सुरक्षारक्षकाचे काम करीत होते. त्यांचा मोठा मुलगा सोहम हा गुजराल पेट्रोल पंपाच्या मागच्या बाजूला राहणाऱ्या त्यांच्या सासऱ्यांकडे काही दिवसांपासून राहण्यासाठी गेला होता. त्याला परत घरी घेऊन येण्यासाठी पवार हे लहान मुलगा कार्तिकसोबत दुचाकीने निघाले होते. त्याचवेळी शिव कॉलनीकडून येणाऱ्या एका भरधाव कंटेनरने पवार यांच्या दुचाकीस जोरदार धडक दिली.

फॉर्म ए - जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

विझक्राफ्ट इंटरनॅशनल एन्टरटेन्मेंट प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता

संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	विझक्राफ्ट इंटरनॅशनल एन्टरटेन्मेंट प्रायव्हेट लि.
२.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक	०५.०५.१९९७
३.	प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले	आरओसी - मुंबई
४.	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक	U92100MH1997PTC107787
५.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता	**सत्यदेव प्लाझा, ५ वा मजला, फन रिपब्लिक लेन ऑफ न्यू लिंक रोड, अंधेरी (प), मुंबई ४०००५३ भारत**
६.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक	१०-०५-२०२१ (आयआरपीच्या सुधारित नावासह एनसीएलटी आदेश दि. ११.०६.२०२१ रोजी अपलोड करण्यात आला)
७.	दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक	०३.१२.२०२१
८.	अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक	परवीन बन्सल, IBBI/IPA-001/IP-P00175/2017-2018/10344
९.	मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल	**जे-३४७, ब्लॉक जे, सरिता विहार, नवी दिल्ली-११००७६,** pkbansal00@gmail.com
१०.	अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल	**ई-४४/३, पॉकेट डी, ओखला इंडस्ट्रीयल एरिया, फेज II, नवी दिल्ली-११००२०.** wizcraft.international@pbinsolvency.com
११.	दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक	२५.०६.२०२१
१२.	अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये कर्जदारांचे वर्ग, जर असल्यास.	लागू नाही
१३.	वर्गामध्ये कर्जदाराचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे)	लागू नाही
१४.	(अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल :	वेब लिंक: https://www.ibbi.gov.in/home/downloads भौतिक पत्ता: लागू नाही

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी दिनांक १०.०५.२०२१ रोजी **विझक्राफ्ट इंटरनॅशनल एन्टरटेन्मेंट प्रायव्हेट लिमिटेड**ची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.

विझक्राफ्ट इंटरनॅशनल एन्टरटेन्मेंट प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह २५.०६.२०२१ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे.

इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करु शकतात.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

परवीन बन्सल

दिनांकः ११.०६.२०२१ **अंतरिम ठराव व्यावसायिक**

ठिकाणः नवी दिल्ली IBBI/IPA-001/IP-P00175/2017-2018/10344

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली **अहिल्याबाई सन्या धापटे व इतर** यांचे मालकीहक्काची व कब्जेवहिवाट असलेली **मौजे माळ, ता.शहापूर, जि.ठाणे** येथील जमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदीखताद्वारे विकत घेणेचे निश्चित केले आहे.

जमिनीचे परिशिष्ट

मौजे माळ, ता.शहापूर, जि.ठाणे

गावाचे नाव	शेतकऱ्याचे नाव	गट क्रमांक	क्षेत्रफळ (हे.आर.प्र.)	आकार (रु.पै.)
मौजे माळ ता.शहापूर, जि.ठाणे	अहिल्याबाई सन्या धापटे व इतर	८७/१	९-१९-००	४-५९

तरीही ज्यांना सदर मिळकतीसंदर्भात इतर हक्क अधिकार अथवा बोजा, क्लेम, वारसाहक्क, बक्षिस, साठेकरार, पोटगीहक्क, अथवा, इतर कोणतेही हक्क कुलमुखत्यारहक्क, भाडेपट्टा हक्क, गहाण हक्क, कोर्ट कारवाई इ. प्रकारचे हक्क असल्यास त्यांनी योग्य त्या कागदपत्रासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत त्यांचा हक्क खालील नमूद पत्त्यावर प्रत्यक्ष भेटून आणि आवश्यक कागदपत्रे दाखवून लेखी स्वरुपात कळवावे. विहीत मुदतीत जर कोणत्याही हरकती प्राप्त न झाल्यास माझे अशिल सदर मिळकतीसंदर्भात व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

सही/-

पत्ताः- मु.पो.आटगांव, ता.शहापूर, जि.ठाणे.

अॅड.सिद्धार्थ अरुण चंद्रमोरे

९२२१८०२६१७/ ९१७२८८६६१८